उपकेंद्राची इमारत अनेक वर्षापासून शोभेची वास्तू; खेट्री येथील चित्र >>पान 2
नागरिकांनी कायदा आणि सुव्यवस्था राखत सण-उत्सव साजरे करा - जिल्हाधिकारी >>पान 2
काठी घोंगड घेऊन भैय्यासाहेब पाटील यांचे अनोखे आंदोलन >>पान 4

**सुविचार**
पायाला स्पर्श करून जाणाऱ्या त्याच लाटा असतात ज्या मोठ्या बोटी बुडवण्याचं सामर्थ्य ठेवतात.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत देण्याची मागणी
आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 30 ■ शुक्रवार, दि. 06 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## उबाठाकडे मेहकरची जागा गेल्यास विद्यमान आमदाराचा 'कस' लागणार


### काँग्रेसला जागा सुटल्यास आमदार रायमुरकर यांना निवडणूक होणार सोपी

### लोकसभेत वाढलेले महाविकास आघाडीचे मतदान कोणाच्या पथ्यावर पडणार

**विधानसभा विशेष**

**मेहकर/विशेष प्रतिनिधी :** मेहकर विधानसभेची निवडणूक सुरू आहे त्या दृष्टीने सर्वच पक्षाच्या हालचाली सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे मेहकर विधानसभेवर आपल्याच पक्षाचा झेंडा फडकला पाहिजे यासाठी सर्वच राजकीय राजकीय पक्ष कामाला लागले आहेत यामध्ये महायुती व महाविकास आघाडी हे महत्त्वाचे पक्ष असून तिसरी आघाडी, वंचित आघाडी कडूनही उमेदवार निवडणूक रिंगणात उतरण्यासाठी जय्यत तयारी करण्यात येत आहे मेहकरची जागा उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला जर सुटली तर विद्यमान आमदार संजय रायमुलकर यांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे मात्र मेहकरची जागा जर काँग्रेस पक्षाला सुटली तर आमदार संजय रायमुलकर यांना ही निवडणूक अगदी सरळ व सोपी होणार आहे लोकसभेत वाढलेले महाविकास आघाडीचे मतदान विधानसभेत कोणाच्या पथ्यावर पडणार हे पाहणे सुद्धा गरजेचे आहे याबाबत सविस्तर वृत्त असे की मेहकर विधानसभेत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसला नेहमीच अपयश येत आहे मात्र यावेळेस लोकसभेत महाविकास आघाडीला मिळालेले चांगले मतदान पाहता महाविकास आघाडीचे चांगले दिवस येण्याची शक्यता आहे मात्र महाविकास आघाडीत मेहकरची जागा कोणत्या पक्षाकडे जाते हे पाहणे सुद्धा महत्त्वाचे आहे काँग्रेस यावेळेस मेहकर विधानसभेवर दावा करत आहे मात्र काँग्रेसला सतत अपयश येत असून विद्यमान आमदार संजय रायमुलकर यांना चांगलाच फायदा होताना दिसत आहे यावेळेसही काँग्रेसकडून मेहकरची जागा मागितल्या जात आहे त्यामुळे नेमके राजकारण काय चालू आहे हेच जनतेला कळेनासे झाले आहे दुसरीकडे शिंदे गट व उद्धव बाळासाहेब ठाकरे गट असे शिवसेनेचे दोन गट पडले आहेत मात्र बाळासाहेब ठाकरे यांना मानणारा मोठा मतदार वर्ग मेहकर मतदार संघात आहे मात्र दोन गट पडल्यामुळे मताची विभाजणी होणार का असा प्रश्न सुद्धा या निमित्ताने उपस्थित होत आहे मात्र अजूनही बाळासाहेब ठाकरे यांना मानणारा मोठा मतदार वर्ग मेहकर मतदार संघात असल्याने जर मेहकरची जागा उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला सुटली व स्थानिक पातळीवरचा उमेदवार जर दिला तर आमदार संजय रायमुलकर यांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे मात्र काहीही असले तरी सध्याचे वातावरण पाहता मेहकरची जागा उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडेच जाईल असे वातावरण तयार झाल्याचे दिसून येत आहे मात्र जर उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला मेहकरची जागा दिली तर काँग्रेस पक्ष इमानदारीने काम करणार का असाही प्रश्न उपस्थित होत आहे तर या महायुती व महाविकास आघाडीच्या भानगडी मध्ये तिसरी आघाडी व वंचित बहुजन आघाडी नेमकी कोणती भूमिका बजावणार कोणत्या उमेदवाराला पाडण्यासाठी मतदान खाणार किंवा कोणत्या उमेदवाराला आणण्यासाठी मतदान खाणार हे पाहणे सुद्धा गरजेचे आहे मात्र काहीही असले तरी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या गटाकडून सिद्धार्थ खरात यांनी तीन सप्टेंबर रोजी शिवबंधन बांधले आहे तर डॉक्टर जानू मानकर गोपाल बचीरे यांचीही नावे चर्चेमध्ये आहेत सध्या मेहकर मतदारसंघाची परिस्थिती पाहता महायुतीकडून शिंदे गटाला मेहकरची जागा फायनल असून आमदार संजय रायमुलकर हेच उमेदवार राहणार असल्याचे जवळपास निश्चित असल्याचे बोलल्या जात आहे मात्र दुसरीकडे महाविकास आघाडीमध्ये जागा सोडण्यावरूनच गोंधळ सुरू असून तिकिट अजून कोणालाच फायनल नसल्याची चर्चा आहे. मात्र शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला मेहकर विधानसभा सुटली तर विद्यमान आमदाराला करावी लागणार तार्यावरची कसरत ही मात्र तेवढेच खरे..





## नंदुरबारच्या गणेश मुर्त्यांना गुजरात व मध्यप्रदेशमधून मोठ्या प्रमाणात मागणी

### गणेशउत्सवासाठी गणेश मंडळ सज्ज

**दैनिक आपला विदर्भ**

**नंदूरबार/प्रतिनिधी :** नंदुरबारच्या गणेश मुर्त्यांना महाराष्ट्रातच नव्हे तर गुजरात आणि मध्यप्रदेश राज्या मधूनही मोठ्या प्रमाणात मागणी आहे. नंदुरबार जिल्हा हा गुजरात व मध्यप्रदेश राज्याच्या सीमावर्ती भागावर असल्याने नंदुरबारच्या गणेशमुर्त्याचे आकर्षण सर्वदूर प्रसिद्ध आहे. आकर्षक गणेश मूर्त्यासाठी नंदुरबार चे नाव सर्वदूर प्रसिद्ध आहे.यामुळे गुजरात व मध्य प्रदेशच्या मंडळाकडून मोठ्या प्रमाणात गणेश मुर्त्या खरेदी करण्यात आल्या आहेत .गणेशोत्सव आता अवघ्या दोन दिवसात येऊन ठेपला आहे त्यामुळे गणेश मंडळांकडून गणेश मूर्ती घेऊन जाण्यासाठी कारखान्यांवर मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. गुजरात ,मध्य प्रदेश सोबत बाहेर गावातील मंडळाकडून गणपती घेऊन जाण्यासाठी मंडळांची गर्दी दिसून येत आहे.

नंदुरबार शहरातील गणेश मूर्तीचे कारखाने हे गणपती उत्सवाच्या दोन महिना अगोदरपासूनच सुरु होतात आणि बुकिंग देखील आधीपासूनच करण्यात येते.यावर्षी ५ हजार पासून तर ७० हजार पर्यंत गणेश मूर्त्यांच्या किमती असून सगळ्यात जास्त मागणी ही गुजरात मधून करण्यात आली जवळपास ३५ टक्के बुकिंग गुजरात राज्यांमधून करण्यात आले आहे तर २० ते २५ टक्के बुकिंग मध्यप्रदेश राज्यमधून करण्यात आली आहे. एकंदरीतच यावर्षीचा गणेशोत्सव धुमधडाक्यात साजरा होणार आहे त्यासाठी सर्व मंडळ सज्ञ झाले आहेत नंदुरबार शहरात जवळपास लहान मोठे मिळून २० गणपतीचे कारखाने आहेत.यातून करोडो ची उलाढाल होण्याची शक्यता कारखाना मालकांकडून वर्तवण्यात येत आहे.

## राजकोट येथील पुतळा दुर्घटनेतील शिल्पकार जयदीप आपटे व तांत्रिक सल्लागार डॉ. चेतन पाटील यांना १० सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी

**दैनिक आपला विदर्भ**

**मालवण/प्रतिनिधी :** राजकोट किल्ला येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची घटना २६ ऑगस्ट रोजी घडली होती. या प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार पुतळ्याचा ठेकेदार जयदीप आपटे, तांत्रिक सल्लागार डॉ. चेतन पाटील या दोघांविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. यातील तांत्रिक सल्लागार डॉ. चेतन पाटील याला यापूर्वीच अटक करण्यात आली होती.



तर जयदीप आपटे हा फरार होता. त्याच्या विरोधात सिंधुदुर्ग पोलिसांनी लूक आउट नोटीसही जारी केली होती. यात काल रात्री मुख्य संशयित आरोपी जयदीप आपटे याला कल्याण येथून त्याच्या राहत्या घरातून पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्यानंतर त्याला सिंधुदुर्ग पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले होते. आज सकाळी त्याला मालवण पोलीस ठाणे येथे आणण्यात आले. दुपारी या दोन्ही संशयित आरोपींना मालवण येथील न्यायालयात हजर करण्यात आले. सरकारी पक्ष व संशयित आरोपींच्या वकिलांची बाजू ऐकल्यानंतर न्यायाधीशांनी या दोन्ही संशयित आरोपींना १० सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## नागरे महाविद्यालयाने राबवले शिक्षक दिनी 'एक पेड माँ के नाम'

**दैनिक आपला विदर्भ**

**■ देवानंद सानप**

**दुसरबिड :** स्थानिक दुसरबीड नारायणराव नागरे महाविद्यालय मध्ये शिक्षक दिनाचे औचित्य साधून वृक्ष जनजागृती करण्याच्या हेतूने भारत सरकारने राबवलेल्या उपक्रम एक वृक्ष माँ के नाम राष्ट्रीय सेवा योजना विभाग व वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने राबवण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये व नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी या दृष्टीने प्राचार्य डॉ. विजय नागरे अधिसभा तथा व्यवस्थापन परिषद सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रभात फेरी काढून वृक्ष जनजागृती केली तसेच शिक्षक दिन साजरा केला

शिक्षक दिनाचा कार्यक्रम साजरा करताना कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजय नागरे तसेच व्यासपीठावर उपस्थित भगवान बाबा शिक्षक प्रसारण मंडळ रुम्हणा संचालिका प्रा. सा. धनश्री कायंदे प्रा.डॉ. गणेश घुगे प्रा. डॉ. दीपक देशमाने प्रा. एस. आर. वाघ व एकदिवसीय विद्यार्थ्यांमधून नियुक्त केलेले प्राचार्य कु. पायल सांगळे उपस्थित होते प्राचार्यांच्या हस्ते महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांचा पुष्प व पेन देऊन सन्मान करण्यात आला तसेच




एक दिवशीय नियुक्त केलेले शिक्षक कु. पायल सांगळे कु. दिक्षा मांटे कु. कल्याणी सानप कु. वैशाली मिसाळ कु. ललिता जाधव कु. रक्षा लहाने कु. अश्विनी नागरे कु. प्रतीक्षा मुळे कु. ईश्वरी केवट कु. कल्याणी गीते कु. प्रतीक्षा गवई कु. नेहा काकड कु. अस्मिता मोहिते कु . वैष्णवी सानप , अनुराग ससाने, रोहित मांटे युवराज पव्हरे, ज्ञानेश्वर दौंड, तायडे, उदय सांगळे, संकेत वाघ कुणाल वानखेडे, तुषार वंजारे यांचा सुद्धा पेन व पुष्प देऊन सत्कार करण्यात आले. यानंतर एकदिवशीय विद्यार्थी शिक्षक यांनी वर्गात जाऊन अध्यापन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. दिक्षा मांटे हिने केले. प्रास्ताविक कु. नेहा काकड हिने केले तसेच या कार्यक्रमाचे आभार कु. वैष्णवी मिसाळ या विद्यार्थिनीने केले. या कार्यक्रमाप्रसंगी प्रा भगवान शिंदे प्रा. देवानंद नागरे प्रा. शेख युनूस प्रा. नयना गवारे प्रा. मिलिंद गवई प्रा. सत्यम श्रीवास्तव प्रा. महेश कायंदे प्रा. सुशांत गुंजाळ तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लाचखोरीमुळे वृक्ष लागवड मोहिमेचा फज्जा

### जिल्हाधिकारी यांच्याकडे शिवसंग्रामची तक्रार

**दैनिक आपला विदर्भ**

**■ नासीर शेख**

**पातूर :** पर्यावरणाचा समतोल ठेवण्यासाठी व गाव पातळीवर गोरगरिबांना मजुरी उपलब्ध व्हावे या उद्देशाने शासनाने गेल्या अनेक वर्षापासून वृक्ष लागवडीची मोहीम सुरू केली, परंतु लचखोरीमुळे पातुर तालुक्यात वृक्ष लागवड संगोपणावर शासनाची कोट्यावधी रुपयांची लुबाडणूक होत असल्याचा आरोप शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष दिलीप परनाटे यांनी ५ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या तक्रारीतून केला आहे. वृक्ष लागवडीच्या संगोपणावर कोट्यवधी रूपांचे देयक काढणे सुरू आहे. देयक काढण्यासाठी हजारो रुपयांची लाच घेतली जात असल्याने वृक्ष लागवड मोहिमेचा फज्ञा उडाल्याचे चित्र असून, अभियंता ऑपरेटर यांच्या बँक खात्याची व या सर्व प्रकाराची चौकशी करा अन्यथा जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाला बसण्याचा इशारा शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष दिलीप परनाटे यांनी दिला आहे.सदर आरोपावर अभियंता यांच्याशी विचारणा केली असता, त्यांनी आरोप फेटाळले.



### वृक्ष लागवडीची वाढ का खुंटली ?

गेल्या अनेक वर्षापासून पातुर तालुक्यातील ग्रामपंचायत अंतर्गत वृक्ष लागवड करण्याची मोहीम गेल्या अनेक वर्षापासून सुरू आहे.मात्र वृक्ष लागवडीची वाढ तीन ते पाच फुटापर्यंतच आहे. कोट्यावधी रुपये काढल्यानंतरही वृक्षाची वाढ का खुंटली असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### वरिष्ठांच्या नावावर अभियंता व ऑपरेटर यांनी घेतली लाच

वृक्ष लागवडीचे देयक काढण्यासाठी अभियंता व ऑपरेटर यांनी वरिष्ठांच्या नावावर एका रोजगार सेवकाकडून फोन पे वर हजारो रुपयांची लाच घेतल्याचे उघडकीस आले, त्यामुळे त्यांच्या खात्याची चौकशी करण्याची गरज आहे.

## पोक्सो गुन्हे अधिक संवेदनशीलतेने हाताळण्याचे पोलिसांना आदेश

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** बदलापूर लैंगिक अत्याचाराच्या घटनेमुळे राज्यभर अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून मुंबईत लैंगिक अत्याचाराच्या, विशेषकरून अल्पवयीन मुलांवरील अत्याचाराच्या घटना अधिक संवेदनशीलतेने हाताळून तात्काळ गुन्हा दाखल करण्याचे आदेश सर्व पोलिसांना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिले आहेत.

याशिवाय बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कायद्याअंतर्गत (पोक्सो) दाखल प्रत्येक गुन्ह्यात स्थानिक उपायुक्तांना पीडित व त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांना सुरक्षेबाबत आश्वस्त करण्यास सांगण्यात आले आहे. परिणामी, मुंबईत पोक्सो कायद्याअंतर्गत दाखल होणाऱ्या गुन्ह्यांच्या संख्येत वाढ झाली असून गेल्या १२ दिवसांत मुंबईत पोक्सो कायद्याअंतर्गत सुमारे १२१ गुन्हे दाखल झाले आहेत. त्यातील ९८ टक्के गुन्ह्यांमध्ये आरोपींना अटक झाली आहे. पोक्सो कायद्याअंतर्गत मुंबईत महिन्याला सरासरी ९० ते ९५ गुन्हे दाखल होत होते, पण बदलापूर प्रकरणानंतर अल्पवयीन मुलांच्या लैंगिक अत्याचाराची प्रकरणे अधिक संवेदनशीलतेने हाताळण्याचे आदेश मुंबईतील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिले आहेत.

## मोदी आणि झेलेन्स्की यांची ऐतिहासिक भेट

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २३ ऑगस्ट २०२४ ला युक्रेनचे राष्ट्रपती व्लादिमिर झेन्स्की यांच्याशी 'पॅले यांच्या निवासस्थानी मनमोकळी चर्चा केल्याचे वृत्त आहे. ही भेट म्हणजे दुसरे–तिसरे काहीही नसून संतुलन साधण्याची कृती आहे, असे मानणारा एक गट आहे. रशियाला जाऊन आल्यानंतर युक्रेनला गेलात तर संतुलन साधले जाईल, अशी ही भूमिका आहे. युक्रेन व रशिया यात युद्ध सुरू असताना मोदी रशियाला गेले होते. मोदींच्या रशिया दौऱ्यावर पाश्र्चात्त्य देशांनी नाराजी व्यक्त करत भारतावर एकतर्फी भूमिका घेतल्याचा आरोप केला होता; त्यावरचा उतारा ही भेट आहे, असे मानणारे अनेक आहेत. भारत आणि युक्रेनदरम्यान द्विपक्षीय संवाद आवश्यक झाला होता.. युद्ध सुरू असतानाही भारत आणि युक्रेनमधील व्यापारी संबंधांमध्ये विशिष्ट वस्तूंवरील बंधने स्वीकारून केलेल्या व्यापारात वाढ झाली आहे. याशिवाय भारत युक्रेनला युद्धानंतर कशी मदत करू शकतो, यावर चर्चा करण्याची इच्छा उभयपक्षी नक्कीच निर्माण झाली असावी. जसे की भारत युक्रेनला औषधे रुग्णसुविधा, अन्य पायाभूत सुविधा व सुधारणा याबाबत कशी मदत करू शकतो, हा मुद्दा महत्त्वाचाच होता. आता युक्रेनसोबतचे व्यापारी व्यवहार जोरात सुरू राहतील. मोदींनी झेलेन्स्की यांच्या पाठीवर ठेवलेला हात हेच तर सूचित करीत नसेल ना? अमेरिकेच्या दबावाखाली मोदी युक्रेनला गेले, असे काहींना वाटते तर रशियालाही मोदींनी युक्रेनला जावे व झेलेन्स्कींच्या मनाचा अंदाज घ्यावा, असे वाटत असावे, असा काहींचा कयास आहे. कारण आता युक्रेनच्या फौजा रशियात घुसून मारताहेत. गोंधळलेल्या आणि चडफडणाऱ्या पुतिन यांना मोदींची युक्रेन भेट उपयोगाची आहे, असे तर वाटले नसेल ना? असे अनेक अंदाज आहेत. मोदी रेल्वेने सात तासांच्या प्रवासासाठी पोलंडमधून युक्रेनच्या राजधानीकडे कीवकडे भल्या पहाटेच निघाले होते. यावेळीही विमान हल्ल्यांच्या सूचना देणारे भोंगे वाजतच होते; त्याचवेळी कीवमध्ये मोदींना घ्यायला आलेल्यांची लगबगही सुरू होती. हा दिवस युक्रेनचा 'नॅशनल फ्लॅग डे' होता. दुसऱ्या दिवशी युक्रेनचा 'स्वातंत्र्य दिन' होता. हा मुहूर्त साधून युक्रेनच्या मोठ्या शहरांवरही याच काळात रशिया क्षेपणास्त्रांचा मारा करीत होता. भारतीयांबाबतचा एक कुतूहलाचा भाव युक्रेनमध्ये आहे. भारताच्या पंतप्रधानांची युक्रेनला ही पहिलीच भेट होती. यामुळेही युक्रेनमध्ये संमिश्र स्वरूपाचे वातावरण होते, असे म्हटले जाते. सध्या सुरू असलेल्या युद्धासंबंधात भारताची नक्की भूमिका कोणती आहे, हे युक्रेनला जाणून घेण्याची इच्छा तर नक्कीच आहे. रशिया आणि भारत यांची मॉस्कोमध्ये गळाभेट होत असतानाच्या प्रसंगी कीवमधील मुलांच्या हॉस्पिटलवर क्षेपणास्त्रांचा हल्ला सुरू होता. हे पाहून झेलेन्स्की यांच्या मनाचा प्रचंड क्षोभ झाला असला पाहिजे. आज एकीकडे अमेरिका आणि नाटो तर दुसरीकडे रशिया, चीन, उत्तर कोरिया आणि इराण अशी स्थिती आहे. युरोपातील अनेक राष्ट्रांचा युक्रेनला पाठिंबा आहे, हे नक्की; त्याची कारणे मात्र वेगवेगळी आहेत. हंगेरीचे व्हिक्टर ओरबान यांचा पाठिंबा नाईलाजापोटी आहे. युक्रेनला पाठिंबा न द्यावा तर रशिया खूश होईल; पण युरोपातली इतर राष्ट्रे नाराज होणार. जर्मनीचा युक्रेनला मनापासून पाठिंबा आहे; पण जर्मनीचे रशियाशी जे व्यापारी संबंध आहेत, त्याचे काय? तेलवाहिन्यांचे जाळेच आहे की! तेही पायला हवे ना? बाल्टिक राष्ट्रे युक्रेनला मनापासून पाठिंबा देत आहेत. या मागचे कारण काय, तर रशिया आणि बाल्टिक राष्ट्रे यांच्या मधोमध असलेले युक्रेन आज रशियाचे आघात सहन करते आहे. युक्रेनला भारताची तटस्थता समजत नाही, पण भारत तटस्थ आहे. कारण त्याच्या पाठीमागे तशीच मोठी कारणे असली पाहिजेत, असे मानणारे युक्रेनमध्ये आहेत. दुसरी शक्यताही गृहीत धरतात. ती ही की, युक्रेनचा सध्या सुरू असलेला लढा भारताला अमान्य आहे. रशिया–युक्रेन संघर्षात भारताने कधीही त्रयस्थ भूमिका घेतली नाही. उलट आमचा तिसरा शांततेचा पक्ष आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर झेलेन्स्की यांना आश्र्वस्त केल्याचे वृत्त आहे. युद्धाऐवजी राजकीय चर्चाच अधिक फलदायी ठरेल, मुत्सद्दीपणा आणि संवाद हाच संघर्ष सोडवण्याचा एकमेव मार्ग आहे, असे भारताचे मत असल्याचे मोदींनी चर्चेत स्पष्ट केले आहे.

# उपकेंद्राची इमारत अनेक वर्षापासून शोभेची वास्तू; खेट्री येथील चित्र

दैनिक आपला विदर्भ

■ नासीर शेख



**पातूर :** पातुर तालुक्यातील खेट्री येथे लाखो रुपये खर्च करून आरोग्य उपकेंद्राची इमारत अतिक्रमणच्या विळख्यात असल्याने दहा ते बारा वर्षांपासून लोकार्पण रखडले आहे. ग्रामस्थांना मोफत आरोग्य सेवा मिळावी या हेतूने शासनाने लाखो रुपये खर्च करून आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीचे बांधकाम केले, परंतु इमारतीचे लोकार्पण रखडले आहे. त्यामुळे शासनाने इमारत बांधकामावर केलेले लाखो रुपये पाण्यात गेल्याचे चित्र आहे. खेट्री येथील बसस्थानक जवळ असलेल्या आरोग्य उपकेंद्राच्या नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. मात्र इमारतीचे लोकार्पण झाल्याने शोभेची वस्तू बनली आहे. याकडे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याने परिसरातील ग्रामस्थ आरोग्यसेवा पासून वंचित आहे.इमारत तयार झाल्यावरही परिसरातील रुग्णांना त्रास सहन करावा लागत आहे. गोरगरिबांना खाजगी डॉक्टरांकडे उपचार घ्यावे लागत असल्याने रुग्णांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. इमारतीचे लोकार्पण करून आरोग्यसेवा सुरू करण्याबाबतची तक्रार ग्रामस्थांनी संबंधिताकडे वारंवार केली, परंतु संबंधितांकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेऊन लोकार्पण करून आरोग्यसेवा सुरू करण्याची मागणी खेट्री परिसरातील ग्रामस्थांकडून होत आहे.

### खाजगी खोलीतून केला जातो उपचार

काही वर्षांपूर्वी शासनाने डॉक्टर समुदाय अधिकारी यांची नियुक्ती केली आहे. तीन ते चार गावा मिळून एक सेंटर बनवून रुग्णावर उपचार केला जातो. खेट्री येथे आरोग्य उपकेंद्र हा तीन ते चार गावाचा सेंटर आहे. परंतु आरोग्य इमारत तयार असूनही खाजगी खोलीतून उपचार केला जातो.

इमारतीवरील खाजगी ताबा हटविण्यात आला असून, परिसरात अतिक्रमण काढण्यासाठी आरोग्य विभाग व ग्रामपंचायत याच्या कडून इमारतीच्या जागेची मोजणीसाठी मोजणी विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे. मोजणी झाल्यावर तातडीने इमारीचे उद्घाटन करून आरोग्य सेवा सुरळीत करण्यात येईल

–जहूर खान
सरपंच, खेट्री

# बेलगाव येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा

दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**बेलगाव :** महादजी दर्याजी पाटील माध्यमिक विद्यालय बेलगाव या ठिकाणी डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्ण तसेच चक्रधर स्वामी यांच्या जन्मदिनानिमित्त स्वयंशासन दिन साजरा करण्यात आला यामध्ये संपूर्ण दिवसभर इयत्ता दहावीच्या विद्यार्थी विद्यार्थिनी शिक्षकाची भूमिका निभावून संपूर्ण प्रशासन सांभाळले यामध्ये मुख्याध्यापक म्हणून वर्ग १० चा विद्यार्थी शेख अमीर शेख अन्सार यांनी भूमिका निभावली तर सहशिक्षक म्हणून ज्ञानेश्र्वरी दशरथ लहाने प्रतीक्षा दत्ता बोरकर आरती उद्धव सदावर्ते महेक नाज शादाब खान अंजली अनंता इंगळे प्रांजल कैलास इंगळे रीना विलास चव्हाण प्रियंका कैलास राठोड तेजस्विनी सुरेश राठोड नेहा सुभाष वानखेडे पल्लवी संजाबराव देशमुख कार्तिक रामेश्र्वर बोरकर श्यास गजानन चव्हाण धनराज केशव इंगळे तुषार रवींद्र नवघरे तेजसदिलीप कांबळे यश संतोष बोरकर शेख अलीम शेख रफीक या विद्यार्थ्यांनी शिक्षकाची भूमिका साकारून संपूर्ण दिवसभर प्रशासन सांभाळले त्यानंतर डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन व चक्रधर स्वामी यांच्या जयंती दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान विद्यालयातील गणित शिक्षक एच एलवानखेडे सर यांनी भूषवले तर उपस्थितीमध्ये विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक कावरखे सर मेटांगळे सर जायभाय सर हे होते डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या जीवनावर वानखेडे सरांनी प्रकाश टाकून त्यांच्या कार्याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली शिक्षक कसा असावा याबद्दल त्यांनी डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या शिक्षणाने समाजाची प्रगती होते व विद्यार्थ्यांमध्ये वैचारिक क्षमता आणि आत्मविश्र्वास निर्माण करण्यासाठी डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्ण यांनी संपूर्ण आयुष्यभर काम केली ते



स्वतः एक उत्तम शिक्षक असल्यामुळे त्या पेशाबद्दल वाटणारे प्रेम त्यासाठी केलेली चाळीस वर्षाची कार्य यांचा सन्मान करण्यासाठी भारत सरकारने ५ सप्टेंबर हा त्यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्याची १९६२ पासून जाहीर केले त्याचप्रमाणे चक्रधर स्वामींनी सुद्धा समाजातील अज्ञान अंधश्रद्धा दूर करू एक साक्षर समाज घडविण्यासाठी प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्ग १० ची विद्यार्थिनी ज्ञानेश्र्वरी दशरथ लहाने हिने केले तर आभार अनिल जायभाये सर यांनी मानले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक कावरखे सर वानखेडे सर मेटांगळे सर गायकवाड सर शिक्षकेतर कर्मचारी विजय दाभाडे गजानन देशमुख मधुकर कांबळे सह विद्यार्थी विद्यार्थिनी परिश्रम घेतले

## अभिनेता रितेश देशमुख वाघनख्या पाहण्यासाठी चक्क साताऱ्यात

दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी :** माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे सुपुत्र आणि सुप्रसिद्ध अभिनेते रितेश देशमुख यांनी सातारच्या छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयाला भेट देऊन वाघ नख्यांची पाहणी केली आहे. तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील शिवकालीन शस्त्र पाहून त्यांनी या संग्रहालयाचे विशेष कौतुक केले आहे. अभिनेते रितेश देशमुख सध्या बिग बॉसच्या माध्यमातून पुन्हा एकदा चर्चेत आल्यास ते या शोमध्ये बिझी असताना देखील त्यांनी वेळात वेळ काढून साताऱ्यातील निसर्गरम्य परिसरात आपल्याला एक मराठी चित्रपट निर्माण करायचा आहे. या उद्देशानेच दोन दिवस साताऱ्यात भटकंती केली आहे. त्यामध्ये सातांऱ्यातील मेणवली घाट वाईमाबळेश्र्वरचा परिसर तसेच साताऱ्यातील अनेक चित्रपटांची लोकेशन पाहून त्यांनी ती लोकेशन कॅमेरा बंद केली आहेत. याच दरम्यान त्यांनी साताऱ्यात छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयात असलेल्या वाघनख्यांची देखील पाहणी केली आहे. वाघनख्यांबरोबरच सातारच्या संग्रहालयात असलेल्या दुर्मिळ शिवकालीन वस्तू पाहून त्यांनी समाधान व्यक्त करत या दुर्मिळ वस्तू पहिल्यांदाच पाहायला मिळाल्या आहेत, असे उद्गार देखील संग्रहालयाच्या प्रशासनासमोर काढले आहेत.

# कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित असलेल्या वीज ग्राहकासाठी महावितरणची अभय योजना

■ लाभ घेतल्यास जिल्ह्यातील एक लाख ग्राहकांचे होणार १२ कोटी माफ

■ व्याज,विलंब आकार माफीसह थकबाकी हप्त्यात भरण्याची सोय

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** वीज बिलाच्या थकबाकीमुळे कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित असलेल्या जिल्ह्यातील घरगुती,व्यावसायिक आणि औद्योगिक वर्गवारीतील १ लाख ७१४ ग्राहकांना महावितरण अभय योजना २०२४ मध्ये सहभागी होऊन थकबाकीमुक्त होण्याची संधी उपलब्ध झालेली आहे. थकबाकीदार ग्राहकांनी थकबाकीची ८२ कोटी २९ लाख रूपयाची मुद्दल रक्कम भरल्यास थकबाकीवरील व्याज आणि विलंब आकाराचे एकूण १२ कोटी रुपये माफ होणार आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार कोणत्याही जागेच्या मालक किंवा खरेदीदार किंवा ताबेदार यांनी वीजबिलाची थकबाकी रक्कम भरणे बंधनकारक आहे. तथापि, थेट कायदेशीर कारवाई करण्याच्या ऐवजी ग्राहकांना एक संधी म्हणून सवलतीची योजना लागू केली आहे.

महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक श्री.लोकेशचंद्र यांनी मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार ग्राहकांना दिलासा देण्यासाठी १ सप्टेंबरपासून ही योजना राज्यात लागू करण्यात आली आहे.

### योजना आणि योजनेचा कालावधी

राज्यात ३१ मार्च २०२४ पर्यंत थकीत बिलामुळे कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित झालेल्या (पीडी) घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांसाठी ही योजना आहे. थकित बिलांच्या योजनेत कृषी ग्राहकांचा समावेश नाही. योजनेचा कालावधी १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर २०२४ आहे.

### सहा हप्त्यात थकबाकी भरता येणार

* या योजनेत मुद्दल बिलाच्या ३० टक्के रक्कम भरून ऊर्वरित ७० टक्के रक्कम सहा हफ्त्यात भरायची सोय आहे.
* जे घरगुती, व्यावसायिक इत्यादी लघुदाब ग्राहक एक रकमी थकित बिल भरतील त्यांना दहा टक्के सवलत देण्यात येईल.
* उच्चदाब औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना पाच टक्के सवलत मिळेल.

### असा लाभ घेता येणार

संबंधित वीज ग्राहकांना www.mahadiscom.in/wss/wss या वेबसाईटवरून ऑनलाईन पद्धतीने अभय योजनेचा लाभ घेता येईल. महावितरणच्या मोबाईल पवरून योजनेचा लाभ घेता येईल. वीज ग्राहक १९१२ किंवा १८००२३३३४३५ किंवा १८००२१२३४३५ या टोल फ्री क्रमांकावर फोन करूनही माहिती घेऊ शकतात. योजनेनुसार पैसे भरल्यानंतर संबंधित वीज ग्राहकाला पुन्हा एकदा नियमित वीज कनेक्शन घेता येईल. त्याच पत्त्यावर नियमानुसार कागदपत्रे सादर करून नव्या नावाने वीज कनेक्शन घेण्याचीही सुविधा असेल.




# नागरिकांनी कायदा आणि सुव्यवस्था राखत सण-उत्सव साजरे करा - जिल्हाधिकारी किरण पाटील

दैनिक आपला विदर्भ

## ✻ गणपती विसर्जन कृत्रिम हौदातच करण्याचे जिल्हाधिकारी किरण पाटील यांचे आवाहन ✻ सर्व यंत्रणांनी समन्वय ठेवावा

**बुलडाणा/प्रतिनिधी :** येणाऱ्या कालावधीत जिल्ह्यात विविध सण आणि उत्सव साजरे होणार असून नागरिकांनी कायदा आणि सुव्यवस्था राखत सर्व सण व उत्सव साजरे करावे असे आवाहन जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी केले. येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित समन्वय समितीच्या बैठकीत श्री. पाटील बोलत होते. यावेळी पोलिस अधीक्षक विश्र्व पानसरे, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, अप्पर पोलीस अधीक्षक भगवान महामुने उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पोळ आदींची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्री. पाटील म्हणाले की, आपल्या जिल्ह्याला सण, उत्सव शांततेत व उत्साहात साजरे करण्याची परंपरा आहे. हा नावलौकीक कायम राखण्यासाठी आपण सर्व प्रयत्न करुया. गणेशोत्सवा दरम्यान नागरिकांना कुठलीही अडचण येवू नये तसेच त्यांच्या अडचणीचे तातडीने निवारण होण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. गणपती विसर्जन नदी किंवा तलावात न करता कृत्रिम हौदातच करावे. विसर्जनाच्या ठिकाणी फिरते स्वच्छ्ता गृह आणि अग्निशामक यंत्रणा ठेवावी. ग्राम पंचायत आणि नगर पालिकेने आपल्या हद्दीतील अवैध अतिक्रमणे तात्काळ काढून टाकावीत. तसेच सण कालावधीत मास विक्री व मद्य विक्री करू नये असे आदेश काढावेत. ग्राम पंचायत आणि नगरपालिका यांनी रस्त्यावरील खड्डे बुजविण्याची कार्यवाही तातडीने हाती घ्यावी, संबधित विभागाने आपले अखत्यारीतील रस्त्यांची डागडुजी गणेशोत्सवापूर्वी पूर्ण करावित. कुठेही वाहतुक कोंडी होणार नाही याची दक्षता घ्यावी, एस.टी. महामंडळाने जादा बस सज्ज ठेवाव्यात, व्यापारी तसेच रीक्षा चालकांशी संवाद साधावा,



महामार्गांवर दिशादर्शक फलक बसवावेत, आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवावी. सदैव विद्युत वितरण विभाग कार्यान्वीत राहील यादृष्टीने पूर्व नियोजन करावे, दुरध्वनी व्यवस्था सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी, वाहतुकीच्या सोयीसाठी एस.टी. बसचे नियोजन करून आवश्यक त्या प्रमाणे वाहने उपलब्ध करुन द्यावीत असेही श्री. पाटील यांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक विश्व पानसरे म्हणाले की, सर्व शासकीय अशासकीय यंत्रणांनी समन्वय ठेवावा. तसेच नागरिकांनी सर्व धर्माचा आदर राखत सर्व सन व उत्सव शांततेत साजरे करावेत. कोणत्याही प्रकारचे समाज विघातक कृत्य होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच कोणत्याही अफवांवर विश्र्वास ठेवू नये. कुठेही अनुचित घटना घडत असल्याचे निदर्शनास येताच तात्काळ पोलिसांना कळवावे. यावेळी बैठकीस सर्व विभाग प्रमुखांची उपस्थिती होती.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### बदलापूर रेल्वे स्थानकात गोळीबार करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी ठोकल्या बेड्या



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी** : बदलापूर रेल्वे स्थानकात झालेल्या गोळीबार प्रकरणी कल्याण रेल्वे पोलिसांनी एका आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. घटनेबाबत रेल्वे डीसीपी मनोज पाटील यांनी माहिती दिली की, चौघे जण होते पैशाच्या वाटपावरून त्यांच्यात वाद झाला व त्यातून फायरिंगची घटना घडली, चौघेही आरोपी रेकॉर्डवरील आरोपी आहेत.गोळीबार करणाऱ्या विकास पगारे नावाच्या आरोपीला ताब्यात घेतलं त्याच्यावर दोन गुन्हे टिटवाळा पोलीस ठाणे , दोन गुन्हे उल्हासनगर मध्ये दाखल आहेत. पैशांच्या देवाण–घेवाण आणि पैशांचा वाटपावरून अचानक त्यांच्यात वाद झाला आणि त्या वादाचे परिणाम गोळीबारात झालं दोन राऊंड फायर करण्यात आले असून त्याने बंदूक कुठून आणली याचा तपास सुरू आहे.

### लालबागचा राजा सार्वजनिक गणेश मंडळ यांच्यातर्फे गणेश मूर्तीचे प्रथम मुखदर्शन



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : लालबागच्या राजाच्या आभूषणाची तसेच मंडपाची चर्चा नेहमी होत असते. यावेळी त्यात मुकुटाची भर पडली आहे त्याच बरोबर १० दिवस चालणाऱ्या या उत्सवासाठी मंडळाने ४००.५८ कोटी रुपायांचा विक्रमी विमा काढला आहे. गेल्या वर्षी मंडलाने ३६०.४० कोटी रुपयांचा विमा काढला होता. लालबागच्या राजाच्या मूर्तीचे पहिले दर्शन थोड्याच वेळात सर्वांना होईल. मंडळाकडून २४ तास दर्शन, पूजा, अन्नदान आणि सेवा सुरू असते. गणेशोत्सवाच्या १० दिवसात ६० हजार वेळा पूजा होते. मंडळाने दिलेल्या माहितीनुसार प्रत्येक दिवशी सरासरी २० हजार लोक दर्शन घेतात आणि एक लाख लोकांना अन्नदान दिले जाते.यावेळी लालबागच्या राजाचे आकर्षण २० किलोचा १६ कोटी रुपये किंमत असलेला मुकुट हे असणार आहे. या मुकुटात पाचू आणि मीना ही रत्ने घडवलेली असून त्याचा घेर सुमारे सहा फुटाचा आहे. रिलायन्स फाउंडेशनने दान केलेला हा मुकुट पाहण्यासाठी सर्व भाविक उत्सुक आहेत.

### प्रेयसीच्या मुलानं उलटी केली म्हणून प्रियकरानं मरेपर्यंत मारलं; चिमुकल्याचा जीव गेला, पुणे हादरलं

**पुणे/प्रतिनिधी** : पुण्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे, या घटनेनं जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. प्रेयसीच्या मुलानं उलटी केल्यामुळे प्रियकराकडून चिमुकल्याची हत्या करण्यात आली आहे. मुलाने उलटी केल्यामुळे ओरोपीकडून चिमुकल्याला बेदम मारहाण करण्यात आली. या मारहाणीमध्ये चार वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाला आहे. एक सप्टेंबर रोजी ही घटना घडली आहे. या प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, आरोपीला अटक करण्यात आली आहे.घटनेबाबत अधिक माहिती अशी की, पुण्याच्या बिबेवाडी परिसरात ही धक्कादायक घटना घडली आहे, प्रेयसीच्या मुलानं उलटी केल्यामुळे प्रियकराकडून चिमुकल्याची हत्या करण्यात आली आहे. चिमुकल्यानं उलटी केल्यामुळे प्रियकराकडून त्याला बेदम मारहाण करण्यात आली, या मारहाणीमध्ये त्याचा मृत्यू झाला आहे. या घटनेनं खळबळ उडाली आहे. या प्रकरणात पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

# श्री शिवाजी विद्यालय निंबा येथे शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रम संपन्न

दैनिक आपला विदर्भ



**निंबा/प्रतिनिधी** : दि.५ सप्टेंबर २०२४ रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती तसेच शिक्षक दिनाचा कार्यक्रम निंबा गावचे प्रतिष्ठित नागरिक तथा पोलीस पाटील मा. श्री प्रमोदजी देशमुख यांच्या संकल्पनेतून तथा निंबा गाव आयोजन समिती प्रमुख म्हणून त्यांनी सर्व शिक्षकांचा सन्मान व आपले परमपूज्य वडील स्व. मुकुंदरावजी गोंडुबापू देशमुख यांचे स्मृती प्रित्यर्थ तीन आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करणे या हेतूने आजच्या कार्यक्रमाचे आयोजन केलेले होते.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सर्वपल्ली डॉ.राधाकृष्णन, डॉ. पंजाबराव देशमुख, स्वर्गीय श्रीधर रावजी देशमुख स्वर्गीय मुकुंदरावजी देशमुख यांचे प्रतिमांचे पूजन व हारार्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माननीय संतोषजी देशमुख माजी पोलीस पाटील निंबा यांनी सादर करून कार्यक्रमाचा उद्देश व रूपरेषा थोडक्यात विशद केली. यानंतर गावचे प्रतिष्ठित व ज्येष्ठ नागरिक माननीय श्री रामदासजी खोट्टे सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आयोजकांची संकल्पना स्पष्ट करून त्यांनी श्रीधरराव देशमुख आणि मुकुंदरावजी देशमुख यांनी कशाप्रकारे समाजाच्या व गावच्या हिताची कामे केली आणि म्हणूनच आपण त्यांच्या स्मृती जपणे आवश्यक आहे याबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर गावचे प्रतिष्ठित नागरिक तसेच निंबा गावचे माजी सरपंच श्री श्रीकृष्णजी मोरखडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत आजच्या कार्यक्रमातून कोणता संकल्प करायचा याविषयी उद्बोधन केले.

यामध्ये प्राथमिक विभागातून आदर्श शिक्षक माननीय श्री राजेशजी तायडे सर माध्यमिक विभागातून आदर्श शिक्षक कु. सुधा बाळसराफ मॅडम आणि जुनियर कॉलेज विभागातून श्री नितीन पाटील सर यांना व्यासपीठावरील मान्यवर तथा निंबा गावचे ज्येष्ठ नागरिक यांच्या हस्ते स्वर्गीय मुकुंदरावजी गोंडूबापू देशमुख यांचे स्मृती प्रित्यर्थ आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये मान्यवरांच्या हस्ते त्यांना हार व सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. त्याचबरोबर विद्यालयाचे सन्माननीय मुख्याध्यापक माननीय श्री भारसाकळ सर तसेच विद्यालयाचे माननीय पर्यवेक्षक श्री खंडारे सर यांचा सुद्धा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यानंतर विद्यालयातील सर्व शिक्षकांना पुष्प देऊन त्यांचा सुद्धा शिक्षक दिनानिमित्त मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सत्काराला उत्तर देत श्री राजेशजी तायडे सर कुमारी सुधा बाळसराफ मॅडम व श्री नितीन पाटील सर यांनी आपल्या सन्मानाप्रती कृतज्ञ भावना व्यक्त केल्या आणि यापुढेही अधिक उत्साहाने व जबाबदारीने कामे पार पाडून आपले कर्तव्य करू असे विचार त्यांनी व्यक्त केले.

यानंतर माझी शिक्षक तथा निंबा गावचे ज्येष्ठ नागरिक श्री नानासाहेब तायडे सर यांनी शिक्षकांना अभिनंदन पर आपले विचार व्यक्त केले. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे शाळा तपासणी अधिकारी तथा माजी मुख्याध्यापक माननीय श्री विखे सर यांनी पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

आपल्या अध्यक्षीय भाषणात माननीय श्री. भारसाकळ सर मुख्याध्यापक श्री. शिवाजी विद्यालय निंबा यांनी शिक्षक दिनानिमित्त सर्व शिक्षकांचा गुणगौरव केला व शिक्षक दिनानिमित्त सर्व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान श्री शिवाजी विद्यालय निंबाचे मुख्याध्यापक माननीय श्री भारसाकळ सर यांनी भुषवले. प्रमुख अतिथी म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे शाळा तपासणी अधिकारी माननीय श्री विखे सर तसेच पोलीस पाटील माननीय श्री प्रमोदजी देशमुख, सरपंच मा. सौ ज्योतीताई सोनोने, उपसरपंच मा. सौ अंजलीताई तायडे, तंटामुक्ती अध्यक्ष मा. श्री निरंजनजी तायडे तसेच निंबा गावचे प्रतिष्ठित नागरिक यांची कार्यक्रमाला उपस्थिती लाभली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. सुधा बाळसराफ मॅडम यांनी तर आभार प्रदर्शन श्री अनिल बढे सर यांनी केले.



### सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी अवतारदिन जयंतीनिमित्त अभिवादन

**बुलडाणा/प्रतिनिधी** : जिल्हाधिकारी कार्यालयात भगवान सर्वज्ञ जिल्हाधिकारी कार्यालयात भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिन जयंती निमित्त हार अर्पण करून अभिवादन करताना जिल्हाधिकारी कीरण पाटील निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पोळ संजय खडसे उपविभागीय अधिकारी बसैया मॅडम जिल्हा पुरवठा अधिकारी संजीवनी मुफडे तहसीलदार प्रकाश डब्बे नायब तहसीलदार गजानन मोतेकर जिल्हा नाझर इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते

## पुस्तकाची प्रतिकृती व महावाचन चा लोगो काढून बालविकास मंदिर शाळेत महावाचन उत्सव साजरा

दैनिक आपला विदर्भ

■ प्रकाश भुरे



**मालेगाव** : मालेगाव येथील तहसील कार्यालयाजवळ बोरगाव रोडवरील श्री वेंकटेश सेवा समिती वाशिम द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथमिक शाळा येथे शासनाद्वारे आयोजित महावाचन उत्सवामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद घेतला. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड व्हावी म्हणून शाळेमध्ये सुसज्ज असे जवळपास ११०० पुस्तकाचे विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय असून वाचनपेढी सुद्धा आहे तसेच वाचन कोपऱ्यामध्ये वृत्तपत्र वेगवेगळी पुस्तके नेहमी ठेवलेले असतात त्यामुळे विद्यार्थ्यांची वाचनाची आवड वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न असतो. विद्यार्थ्यांचे भाषण कौशल्य व वाचन कौशल्य सुधारावे म्हणून परिपाठावेळी शाळेमध्ये नेहमीच कथाकथन गोष्टी कविता हे नेहमीच विद्यार्थ्यांद्वारे प्रगट केल्या जातात. सदर महावाचन उत्सव चांगल्या पद्धतीने पार पाडण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल भिसडे व शिक्षक वृंदांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले

### अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत देण्याची मागणी

दैनिक आपला विदर्भ



**जालना/प्रतिनिधी** : जालन्यात महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी आज एकच्या सुमारास जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना सरसकट मदत देण्याची मागणी महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी केलीय. जालना जिल्ह्यात ४ दिवसांपूर्वी सलग दोन दिवस अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झालंय. जोरदार वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसामुळे शेती पिकांना, फळ बागांना मोठा फटका बसलाय. शिवाय घरांची पडझड झालीय, झाडं उन्मळून पडलीय, विद्युत खांब पडून वीज पुरवठा खंडित झालाय, रस्ते ही तुटले आहेत. जालना जिल्ह्याभरात सलग दोन दिवस झालेल्या अती मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळित झालं आहे. त्यामुळे या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्यांना सरसकट मदत देण्याची मागणी जालना येथील महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी केलीय. यावेळी माजी मंत्री तथा आमदार राजेश टोपे यांच्या हस्ते जालना जिल्हाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी जालना जिल्ह्याचे महाविकास आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंगोली जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेती पिकांचं अतोनात नुकसान




दैनिक आपला विदर्भ


**हिंगोली/प्रतिनिधी** : हिंगोली जिल्ह्यात मागील तीन दिवसांपूर्वी सलग चार ते पाच दिवस अतीवृष्टी, ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्यामुळे जिल्ह्यातील नदी, ओढे यांना पुर आला होता. यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला होता. तर पुराचे पाणी अनेकांच्या घरात–दुकानांत शिरले. यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. तर याच मुसळधार ढगफुटी पावसामुळे जिल्ह्याभरातील शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. तर एक हजाराहून अधिक घरांची पडझड झाली. ऐन सोयाबीन पिकात शेंगा भरण्याच्या वेळेस अतीवृष्टीमुळे संपूर्ण पिकं पाण्याखाली गेली यामुळे पिकांची नासाडी झाली. यामुळे आत्ता पंचनामे नको, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी मदत तात्काळ द्या, अशी मागणी शेतकरी नेते रमेश शिंदे यांनी केली आहे.

# पुठ्ठ्यांच्या मकरातून कागदी मकरातून गड किल्ले संवर्धनाचा संदेश

## गणेशत्सोवाच्या पार्श्वभूमीवर कारागिरांची नवी संकल्पना

दैनिक आपला विदर्भ





**मुंबई/प्रतिनिधी** : गणपती बाप्पाच्या आगमनासाठी अवघे काही दिवस बाकी राहिले आहे. गणपती बाप्पाचे अवघ्या काही दिवसांत घराघरांत आगमन होणार आहे.

मुंबईतल्या बाजारपेठा देखील विविध प्रकारच्या साहित्याने आणि मखरांनी सजल्या आहेत. मात्र पर्यावरण पूरक कागदी मखर बनवणाऱ्या नानासाहेब शेंडकर यांनी आता मखरातून देखील गडकिल्ले संर्वधानाचा संदेश दिला आहे. याचं गडकिल्ले संवर्धानाचा संदेश देण्यासाठी त्यांनी गडकिल्ल्यांची प्रतिकृती असलेले छोटे–मोठे मखर बनवले आहेत. या मखरांना आता मुंबईकरांकडून देखील मोठी पसंती मिळत आहे.

महाराष्ट्रातील गड किल्ल्याची अवस्था बघता त्याचे संवर्धन व्हावे यासाठी नाना शेंडकर आपल्या कलेच्या माध्यमातून पुढाकार घेत आहेत. दिवाळीमध्ये त्यांनी किल्ल्यांचे कंदील तर आता चक्क गड किल्ल्याचे मखर बनवले आहे. नान शेंडकर यांनी गड किल्ल्यांच्या विविध प्रतिकृती बनवल्या असून, यामध्ये छोट्या आणि मोठ्या गड किल्ल्यांच्या मखरांचा समावेश आहे. यामध्ये सिंधुदुर्ग किल्ला, रायगड किल्ला याचा समावेश आहे. सगळ्यात महत्त्वाच अस की यामध्ये सार्वजनिक आणि घरगुती मखराचा समावेश आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळासाठी एकूण शंभर गड किल्ले बनवले आहेत. तर घरगुती गणपतीसाठी छोटे दोनशे मकर बनवले आहेत हे मखर बनवण्यासाठी तब्बल तीन महिन्याचा कालावधी लागला आहे. यासाठी दीडशे ते दोनशे कारागीर लागले.

नानासाहेब शेंडेकरयांच्याकडे पुठ्ठ्यांचे घरगुती छोटे मखर – २५० ते ४५०० रूपयला आहेत. तर १२ बाय १२ या स्टेटस साठी १९ हजार रुपयाचे मकर आहेत. सार्वजनिक मखर– ९००० ते ९०,००० रूपये पर्यंत आहेत.

या पुठ्ठ्यांच्या मकरांना मुंबईकरांची पसंती आहे, सर्वात महत्त्वाचं म्हणजे नानासाहेब शेंडेकर यांनी गड–किल्ल्यांसोबत, जयपुर पॅलेस, राम मंदिर, सिद्धिविनायक मंदिर यांच्या देखील प्रतिकृती साकारल्या असून यांना मुंबईकरांकडून मोठ्या प्रमाणात पसंती मिळत आहे. हे मखर पुठ्ठ्याचे असल्याने हे पर्यावरण पूरक सुद्धा आहेत. तसेच हे मखर पुढच्या वर्षी सुद्धा वापरता येईल असे नानासाहेब शेंडेकरयांनीसांगितले

## वृत्तविशेष...

### अवैध गोष्टींवर आळा बसावा यासाठी शहरात सीसीटीव्ही कॅमेराची नजर राहणार – विजयकुमार गावित




दैनिक आपला विदर्भ

**नंदुरबार/प्रतिनिधी** : नंदुरबार शहराची सुरक्षा व नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेता नगरपालिका हद्दीतील प्रमुख ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा लावण्याचा निर्णय राज्याचे आदिवासी विकास मंत्री नामदार डॉक्टर विजयकुमार गावित यांनी घेतला आहे. नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी नंदुरबार नगरपालिके तर्फे शहराचा सर्वे करण्याचा सूचना अधिकारीना देण्यात आला होता. तो सर्वे पूर्ण झाला असून लवकरच नंदुरबार शहरातील प्रमुख भागात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येणार आहे. यासाठी ३ कोटी ८६ लाख रुपयांचा निधीची तरतूद आदिवासी विकास विभाग अथवा जिल्हा नियोजन मंडळातून मंजूर करण्यात येईल. शहराला शिस्त लागावी अवैध गोष्टींवर आळा बसावा व नागरिकांची सुरक्षा हेच आमचा प्रमुख उद्देश असून नागरिकांची हित लक्षात घेता हा निर्णय घेण्यात आला असल्याचे डॉक्टर विजयकुमार गावित यांनी सांगितले.

### फॅमिली रेस्टॉरंटआड गैरवर्तन; पुन्हा दोन जोडपी पकडली



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी** : तरूण प्रेमीयुगुलांना अश्र्लील चाळे करण्यासाठी ४०० ते ५०० रुपये घेऊन जागा उपलब्ध करून देणाऱ्या राजापेठ परिसरातील वाआ फॅमिली रेस्टॉरंटवर महिला सेलच्या दामिनी पथकाने ५ सप्टेंबर रोजी दुपारी धाड टाकली. यावेळी तेथे दोन जोडपी अश्लिल चाळे करताना आढळून आली.राजापेठ परिसरातील वाआ रेस्टॉरंटमध्ये काही तरुण तरुणी अश्लिल चाळे करीत असल्याची माहिती महिला सेलच्या पोलीस निरीक्षक दिप्ती ब्राह्मणे यांना मिळाली. त्याआधारे पोलीस निरीक्षक दिप्ती ब्राह्मणे यांनी पोलीस उपनिरीक्षक सुषमा आठवले व दामिनी पथकासह वाआ रेस्टॉरंटवर धाड टाकली. तेथे चार तरुण व तरुणी अश्लिल चाळे करताना आढळून आलेत. त्यांच्यावर महाराष्ट्र पोलीस प्रतिबंधक अधिनियमाअन्वये कारवाई करण्यात आली. ही कारवाई पोलीस आयुक्त नवीचंद्र रेड्डी व पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. ४ सप्टेंबर रोजीदेखील गाडगेनगर भागातील दोन कॅफेतून सहा जोडपी पकडण्यात आली होती.

### सेंट ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेत वृक्षारोपन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : सेंट ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था बुलढाणा येथे नवीन बांधण्यात येत असलेल्या इमारतीच्या प्रांगणात रिझर्व बँक ऑफ इंडिया यांच्यामार्फत विविध प्रकारचे वृक्ष भेट म्हणून देण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून लाभलेले रिझर्व बँक ऑफ इंडिया एलडीओ सर्वज्ञ सिंह, जिल्हा अग्रणी व्यवस्थापक के के सिंग, नाबार्डचे जिल्हा विकास अधिकारी रोहित गाडे तसेच आरसेटी संचालक संदीपपपोटेयांचीप्रमूखउपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते वृक्षरोपण करण्यात आले. सर्वज्ञ सिंह यांनी पर्यावरणाच्या रक्षणासाठी सर्वांनी पुढाकार घेऊन वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धनाबाबत मार्गदर्शन केले.

### रिझर्व बँक ऑफ इंडिया येथे वित्तीय साक्षरता कार्यशाळा संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : वित्तीय साक्षरता लोकांना आपली आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी जागरूक करते, त्यांना बचत,गुंतवणूक करण्याकरिता प्रवृत्त करते. आर्थिक समर्थता, आर्थिक व्यवहार चांगल्या पद्धतीने करण्यासाठी ज्यामुळे व्यक्ती व तिच्या कुटुंबांची प्रगती होते. आरबीआय बँक कशाप्रकारे कार्य करते. याविषयी रिझर्व बँक ऑफ इंडिया एलडीओ सर्वज्ञ सिंह यांनी प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले. जिल्हा अग्रणी व्यवस्थापक के के सिंग यांनी देखील प्रशिक्षणार्थ्यांशी संवाद साधला. प्रशिक्षणार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विशेष प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून नाबार्डचे जिल्हा प्रमुख अधिकारी रोहित गाडे, आरसेटी संचालक संदीप पोटे तसेच कर्मचारी वृंद, प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

# काठी घोंगड घेऊन भैय्यासाहेब पाटील यांचे अनोखे आंदोलन

## ➔ रविकांत तुपकर यांच्या आंदोलनाला पाठिंबा

## ➔ अन्यथा तीव्र आंदोलनाचा भैय्यासाहेब पाटील यांचा इशारा






दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : भैय्यासाहेब पाटील यांनी आज मेहकर येथील तहसील कार्यालयामध्ये अनोखे आंदोलन करून अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला भैय्यासाहेब पाटील यांनी काठी व घोंगड घेऊन व करपलेली सोयाबीनचे झाडे घेऊन आंदोलन केले यावेळी करपलेली झाडे नायब तहसीलदार यांना देऊन शेतकऱ्यांच्या पिकांची काय परिस्थिती आहे हे दाखवण्याचा प्रयत्न केला शेतकऱ्यांचे प्रश्न लवकर न सोडविल्यास व रविकांत तुपकर यांच्या अन्नत्याग आंदोलनाची दखल न घेतल्यास भविष्यात तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा सुद्धा भैयासाहेब पाटील यांनी यावेळी दिला सविस्तर वृत्त असे की भैय्यासाहेब पाटील गेल्या अनेक वर्षापासून राजकारणात सक्रिय आहेत शेतकरी सुशिक्षित बेकार गोरगरीब यांच्या प्रश्नासाठी भैय्यासाहेब पाटील सतत पुढाकार घेऊन मागण्याचा पाठपुरावा करत असतात मेहकर मतदार संघातही भैय्यासाहेब पाटील यांचा दांडगा संपर्क आहे भैय्यासाहेब पाटील मेहकर मतदार संघासाठी इच्छुक असून ते जनतेच्या संपर्कात राहून जनसेवा करण्याचा प्रयत्न करीत आहेत याचाच एक भाग म्हणून गेल्या दोन दिवसांपूर्वी मेहकर व लोणार तालुक्यात भयंकर अतिवृष्टी झाली या अतिवृष्टीमध्ये शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे शेतकऱ्यांचे उभे पीक खरडून गेले आहे अनेक घरांची पडझड सुद्धा झाली आहे यावेळी भैय्यासाहेब पाटील यांनी प्रत्येक गावात जाऊन नुकसानीची पाहणी केली आहे तर याचा पाठपुरावा सुद्धा केलेला आहे तर आज अधिकारी व सरकारचे लक्ष वेधण्यासाठी भैय्यासाहेब पाटील यांनी अनोखे स्वरूपाचे आंदोलन करून काठी व घोंगड घेऊन तहसील कार्यालयामध्ये आंदोलन केले यावेळी खराब झालेले सोयाबीन आणून नायब तहसीलदार यांना देण्यात आले यावेळी शेतकऱ्यांना पीक विमा वेळेवर मिळावा अतिवृष्टीची मदत तात्काळ मिळावी सोयाबीन व कापूस पिकाला भाव मिळावा शेतकरी नेते रविकांत तुपकर यांचे सुरू असलेले आंदोलनाची सरकारने तात्काळ दखल घ्यावी त्या आंदोलनात असलेल्या मागण्या सरकारने मान्य कराव्यात अशा विविध मागण्या यावेळी भैय्यासाहेब पाटील यांनी केल्या त्यानंतर भैय्यासाहेब पाटील यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर गटाच्या मोर्चेकरांना भेटी देऊन त्यांच्या समस्या सुद्धा जाणून घेतल्या त्यानंतर लोणार तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी व शेतकऱ्यांच्या इतर मागण्या संदर्भात सुद्धा भैय्यासाहेब पाटील यांनी लोणार तहसीलदारांना निवेदन दिले आहे

## अमृत– इंडो जर्मन टूल रूम या संस्थामध्ये
# युवक युवतींना प्रशिक्षणाची संधी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : इंडो जर्मन टूल रूम (छत्रपती संभाजीनगर) या लघु सूक्ष्म आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या भारत सरकारच्या नावाजलेल्या प्रशिक्षण संस्थेत उद्योगांसाठी आवश्यक असलेले तांत्रिक प्रशिक्षण देण्यात येते. आय.जी.टी.आर. ने महाराष्ट्र संशोधन,उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे या संस्थेसोबत सामंजस्य करार केला आहे या अंतर्गत अमृत संस्थेकडून इंडो जर्मन टूल रूम (छत्रपती संभाजीनगर) च्या माध्यमातून प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांना सहाय्य केले जाणार आहे. अभ्यासक्रमासाठी रुपये ७० हजार पर्यंत मोफत अभ्यासक्रम उपलब्ध.

या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत अमृत संस्थेच्या लक्षित गटातील उमेदवारांना उत्कृष्ट दर्जाचे निवासी तसेच अनिवासी प्रशिक्षण देण्यात येणार असून सदर प्रशिक्षणाचा संपूर्ण खर्च (प्रशिक्षण, राहणे व जेवण) अमृत, पुणे या संस्थेमार्फत करण्यात येणार.



महाराष्ट्रातील खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकतील ज्या जातीना कोणत्याही शासकीय विभाग संस्था , महामंडळ यांच्या योजनेचा लाभ मिळत नाही अश्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकतील १८ ते ४० वयोगटातील पात्रताधारक युवक, युवती सदर योजनेचा लाभ घ्यावा. या योजनेअंतर्गत १५ निवासी प्रशिक्षण अभ्यासक्रम तसेच ३० अनिवासी प्रशिक्षण अभ्यासक्रम आय.जी.टी.आर.(छत्रपती संभाजीनगर) संस्थेच्या छत्रपती संभाजीनगर,वाळूज,पुणे, नागपूर, कोल्हापूर, या उपकेंद्रात दिले जाईल. १० वी पास तसेच आय.टी.आय., डिप्लोमा, डिग्री उत्तीर्ण किंवा अंतिम वर्षात शिकत असलेले उमेदवार या योजनेसाठी अर्ज करावा. इच्छूक उमेदवारचा महाराष्ट्र राज्यात अधिवास असणे अनिवार्य आहे. याबाबत सविस्तर माहिती संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

उद्योगाभिमुख रोजगाराच्या आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून सवाळंबनळाला चालना देणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. या योजनेच्या माध्यमातून अमृत च्या लक्षित गटातील युवक युवतीनी जास्तीतजास्त लाभ घ्यावा असे आवाहन अमृत चे व्यवस्थापकिय संचालक विजय जोशी यांनी केले आहे. इच्छुक पात्रता धारक उमेदवारांनी दि. २० सप्टेंबर २०२४ पर्यन्त अमृत च्या संकेतस्थळावर अर्ज करावे. योजेनच्या अधिक माहितीसाठी अमृत च्या संकेत स्थळाला www.mahaamrut.org.in भेट द्यावी.

## दिव्यांग मतदारांनी आपले नाव मतदार यादीत नोंदणी करावी

दैनिक आपला विदर्भ


**बुलडाणा/प्रतिनिधी** : मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क. ईएलआर–२०२४/प्र.क्र.८८१/ निवडणुक दि २४ जुलै २०२४ नुसार दिनांक १ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत मतदार यादीचा कार्यक्रमानुसार मा. मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडून दिनांक ३० ऑगस्ट २०२४ रोजी मतदार याद्या प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. सदर मतदार यादीमध्ये ज्या दिव्यांग मतदारांची नावे नाहीत अशा दिव्यांग मतदारांचा मेळावा दि. ९ सप्टेबर २०२४ रोजी तहसिल कार्यालयाचे बाजुला असलेली नविन प्रशासकिय इमारत येथे आयोजित करण्यात आलेला आहे.

ज्या दिव्यांग मतदारांची नावे नाहीत अशा दिव्यांग मतदारांना त्यांचे नांव मतदार यादीत नोंदविण्यासाठी त्यांनी स्वत: सोबत फोटो, आधार कार्ड , वयाचा पुरावा किंवा उपलब्ध असल्यास त्यांचे घरातील एखाद्या व्यक्तीचे मतदान कार्ड इत्यादी कागदपत्रांसह उपस्थित राहावे. ज्या व्यक्तींची नावे मतदार यादीत असतील परंतु मतदान कार्ड प्राप्त नसेल अथवा उपलब्ध नसेल अशा व्यक्तींनी सुध्दा त्यांचे फोटो, आधार कार्ड सोबत घेवून दि. ९ सप्टेंबर २०२४ रोजी तहसिल कार्यालयाचे बाजुला असलेली नविन प्रशासकिय इमारत येथे उपस्थित राहून त्यांचे नांव मतदार यादीत नोंदवून घ्यावेत अथवा त्यांचे मतदान कार्ड प्राप्त करून घेण्यासाठी नव्याने नमुना–८ भरुन घेवून मतदान कार्ड प्राप्त करुन घ्यावे असे आवाहन उपविभागीय अधिकारी, तथा मतदार नोंदणी अधिकारी, २२–बुलडाणा विधानसभा मतदार संघ, बुलडाणा तसेच तहसिलदार बुलडाणा तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, २२–बुलडाणा विधानसभा मतदार संघ, बुलडाणा करीत आहे तरी सदर बाबत सर्व राजकिय पक्षाचे प्रतिनिधी तसेच नागरिकांनी नोद घ्यावी.

## क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतिराव फुले अभ्यासिकेचा लोकार्पण सोहळा संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : थोर समाज सुधारक व पहिल्या महिला शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आदर्श घेऊन खामगाव शहरात सर्व सुविधांनी युक्त भव्य अभ्यासिकेचे निर्माण करण्यात आले आहे.सावित्रीबाईंचे स्मरण पुढच्या पिढ्यांनाही राहावे या उद्देशाने आमदार आकाश फुंडकर यांच्या संकल्पनेतून निर्मित या भव्य शैक्षणिक संकुलाला क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतिराव फुले अभ्यासिका असे नाव देण्यात आले आहे. त्या इमारतीचे शिक्षक दिनी



शिक्षकांच्या हस्ते भव्य इमारतीचे लोकार्पण करण्यात आले.

विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक शिक्षण साधने, आरामदायक फर्निचर, एकाग्रतेसाठी शांत व हवेशीर वातावरण, ई लायब्ररी, खुला रंगमंच, ग्रंथालय व प्रशस्त प्रेक्षागृह, मुला– मुलींसाठी स्वतंत्र कक्ष वाचन कक्ष, स्पर्धा परीक्षा, उच्च शिक्षण, तांत्रिक शिक्षण, साहित्य अशा सर्व विषयांची हजारो पुस्तके अशा सर्व शैक्षणिक सुविधांनी सज्ज हे शैक्षणिक संकुल सुमारे ३ कोटी ५० लक्ष रु. खर्चून निर्माण करण्यात आले. स्वर्गीय भाऊसाहेब फुंडकर यांच्या संकल्पनेतून शहरात भव्य अभ्यासिका उघडण्यात आली आहे.

ही अभ्यासिका संपूर्ण राज्यात नाव रूपाला येईल असा विश्र्वास आमदार ड.आकाश फुंडकर यांनी व्यक्त केला.यावेळी शिक्षक दिनाचे औचित्य साधुन खामगांव शहरातील जेष्ठ शिक्षक यांचा सत्कार करण्यात आला. या अभ्यासिकेच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी खामगांव शहरातील सर्व शाळेतील शिक्षक, माजी नगरसेवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्ह्यात अतिवृष्टीने एक लाखावर हेक्टरवील पिकांचे नुकसान झाल्याची जिल्हाधिकाऱ्यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी** : यवतमाळ जिल्ह्यात एक लाख हेक्टरवरील पिकांचे अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिली आहे. त्यांनी स्वत: नुकसानग्रस्त पुसद तालुक्याचा दौरा करून आढावा घेतला आहे. घरात पाणी शिरल्याने अनेकांच्या घरांचे नुकसान झाले आहे. त्याचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दूषित पाण्यामुळे आजार पसरू नये, यासाठी मोहिम राबविण्यात आली आहे. अहवाल प्राप्त होताच शासनाकडे मदतीचा प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे.

# बांधकाम कामगार यांच्या नोंदणी व लाभ वाटप

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : बांधकाम कामगारा यांच्या नोंदणी ,नुतणीकरण ,लाभ वाटप बाबत प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. बांधकाम कामगारांनी नोंदणी करुन घ्यावे. त्यासाठी पुढीलप्रमाणे नोंदणीची पात्रता निकष लक्षात घ्यावे असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी बुलडाणा यांनी केले आहे. १८ ते ६० वर्षे वयोगटातील बांधकाम कामगार मंडळाकडे बांधकाम कामगारांनी नोंदणी करू शकतात. मागील बारा महिन्यांमध्ये ९० दिवसांपेक्षा जास्त दिवस बांधकाम कामगार म्हणून काम केलेले कामगार नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे– अर्जदार पासपोर्ट फोटो, वयाचा पुरावा (आधार कार्ड), ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र, मंडळात नोंदणी करण्याकरीता मंडळाच्या ळुलीी. ारहरलेलु.ळप या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरुन वरीलप्रमाणे दस्तऐवजासह अर्ज सादर करणे अनिवार्य आहे. नोंदणी फी फक्त १ रुपये असून नुतनीकरण वार्षिक वर्गणी १ रुपये आहे. याबबत जे बांधकाम कामगार मागील एक वर्षामध्ये किमान ९० दिवस इमारत व इतर बांधकाम क्षेत्रामध्ये काम केले असल्याचे प्रमाणपत्राच्या आधारे वय वर्ष १८ ते ६० वयोगटामधील व्यक्तींना मंडळाअंतर्गत बांधकाम कामगार म्हणून नोंदित करून घेतले जाते. सदरची नोंदणी एक वर्षापर्यंत ग्राह्य धरण्यात येते व किमान ९० दिवस कामाच्या प्रमाणपत्राच्या आधारे सदर व्यक्तीचे सदस्यत्व नुतनीकरण करण्यात येते. मंडळाअंतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतणीकरणाकरीता संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. बांधकाम कामगारांनी नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटप ऑनलाईन सादर केल्यानंतर मंडळाद्वारे प्राप्त निकषानुसार कागदपत्राची तपासणी करुन अर्ज निकाली काढण्यात येतात. कार्यालयामार्फत प्रत्येक अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा स्थितीबाबत लघु संदेशा (ड्डव्ड) द्वारे बांधकाम कामगारांनी पुरविलेल्या मोबाईल क्रमांकावर प्राप्त होतो. कार्यालयामार्फत अर्ज मंजुर झाल्याचा संदेश प्राप्त झाल्यावर कामगारांनी नोंदणी, नुतणीकरणाची पावती ऑनलाईन प्राप्त करुन घेण्याची सुविधा स्वतः कामगाराच्या मोबाईलवर उपलब्ध आहे. अर्ज ना मंजुर झाल्यास किंवा अर्जामध्ये काही त्रुटी असल्यास कार्यालयामार्फत दिलेल्या त्रुटीची पूर्तता करुन अर्ज परत ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर करणे आवश्यक आहे. मंडळाकडून मंजूर झालेल्या अर्जावर मंडळ मुख्यालयाकडून बांधकाम कामगार



यांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर केलेल्या बँक खात्यात लाभाची रक्कम थेट उड्ढढ ळप ापशू द्वारे कामगारांच्या बँक खात्यावर जमा होतात. बांधकाम कामगारांचे प्राप्त होणारे नोंदणी, नुतणीकरण व विविध लाभ बाबत अर्ज हे कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय संगणकीय प्रणालीद्वारे प्राथम्यक्रमानुसारनिकाली काढण्याची प्रकिया नियमित सुरू असते. वस्तुरुपात वितरीत करण्यात येणारे साहाय्य बाबत जीवित सक्रीय बांधकाम कामगार यांना स्वतः आयोजित कॅम्प मध्ये उपस्थित राहून योजनेचा लाभ घ्यावा. बांधकाम कामगारांनी मंडळामार्फत वाटप सुरु असलेल्या गृहउपयोगी संच तसेच इतर लाभासंबधीच्या कामकाजाकरीता कोणत्याही अमिषाला बळी न पडता नोंदणी व नुतणीकरण करुन घ्यावे. याबाबबीत आपली फसवणूक झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच अतिरिक्त रक्कम मागणी करणाऱ्या व्यक्ती विरुध्द नजीकच्या पोलीस ठाण्यामध्ये परस्पर तक्रार नोंदवावी.